# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Asegaon**

**Date of Good Work done** :- **26/05/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन आसेगाव येथे दाखल अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात आरोपीस '10 वर्षे कारावासाची' शिक्षा झाली आहे. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपींना 03 दिवसांत 03 शिक्षा लागल्या आहेत.

## अल्पवयीन मूक-बधिर मुलीवर बलात्कार प्रकरण

# नराधमास १० वर्ष सश्रम कारावास

### जिल्हा व सत्र न्यायाधिश डॉ.रचना तेहरा यांनी ठोठावली शिक्षा

देशोन्नती वृत्तसंकलन...




**वाशिम** ■ घरची मंडळी लग्नाच्या वरातीमध्ये गेल्याची संधीसाधून घरी एकटीच असलेल्या अल्पवयीन मुकबधीर मुलीला जबरदस्तीने उचलून बाजुच्या शेतामध्ये नेवून तिच्यावर बलात्कार करणाऱ्या नराधमास येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश डॉ.रचना तेहरा यांनी २५ मे रोजी दिलेल्या निकालात १० वर्ष सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

मंगरुळपीर तालुक्यातील एका गावात १८ एप्रिल २०१८ रोजी ही घटना घडली होती. घटनेच्या दिवशी गावात लग्न असल्याने पिडीत अल्पवयीन मुकबधीर मुलीचे आई वडील व बहिणी लग्नाच्या वरातीत गेले होते. लग्नामध्ये डिजेच्या आवाजात नाचगाणे सदर १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी घरी एकटीच होती. या संधीच्या फायदा घेत आरोपी सिकंदर सोमसिंग चव्हाण याने त्या मुलीला जबरदस्तीने उचलून बाजुच्या शेतामध्ये नेले. त्यानंतर त्याने तिच्यावर अतिप्रसंग केला. यावेळी यावेळी मुलीने विरोध करण्याचा प्रयत्न केला.परंतू आरोपीने जबरदस्तीने बलात्कार केला.पिडीता मुकबधीर असल्यामुळे तिला बचावाकरिता आरडा-ओरडा करता आला नाही. या घटनेबाबत पिडीतेने तिच्या आईला घडलेला घटनाक्रम खूणावून व इशारे करुन सांगितला. यावेळी मुलीच्या हातावर पाठीवर मारहाण केल्याचे निर्दशनास आले.तिचे वडील घरी आल्यावर तिच्या वडिलांना घटना सांगितली. त्यानंतर पीडिताच्या वडिलांनी पोलिस स्टेशन आसेगाव येथे आरोपी सिकंदर सोमसिंग चव्हाण याचेविरुध्द फिर्याद दाखल केली.

पोलीस स्टेशन आसेगाव चे ठाणेदार विनायक जाधव यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अन्वय तसेच कलम ३, ४, ५ व ६ लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल केला. या घटनेचा तपास पोलीस स्टेशन आसेगावचे तत्कालीन ठाणेदार विनायक जाधव यांनी पुर्ण करुन मंगरुळपीर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या खटल्यात आरोपीच्या दोषसिध्दीकरिता सरकारपक्षातर्फे सरकारी वकील ॲड. गोवर्धन गंगावणे यांनी एकूण पंधरा साक्षीदार तपासले, साक्षी व पुराव्यानंतर न्यायालयात आरोपी सिकंदर सोमसिंग चव्हाण विरुद्ध सरकार पक्षाने सबळ पुराव्यानिशी गुन्हा सिद्ध केल्यामुळे विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश डॉ. रचना तेहरा यांनी आरोपीला कलम ३७६ भारतीय दंड संहिता व कलम ३, ४, ५ व. ६ लैंगिक गुन्ह्यापासून बालकाचे संरक्षण कायदा २०१२ अन्वये दहा वर्ष सश्रम कारावास , ५००० रुपये दंड व दंड न भरल्यास अधिक सहा महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात सरकार पक्षाच्यावतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड.गोवर्धन गंगावणे यांनी काम पाहिले.( ता.प्र.)